# निशानी २५ वरील आदेश

अर्जदार/फिर्यादी श्री.यशवंत रामचंद्र खुबचंदानी यांनी प्रस्तुतचा अर्ज नगदी रोख रक्कम रुपये ४८,०००/– सुपूर्तनाम्यावर मिळण्यासाठी केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन की, अर्जदार यांचे निर्मल बेकरी या नावाने दुकान आहे. दि.२४.१०.२०२२ ला सायंकाळी ०७.०० वाजता अर्जदार त्यांच्या कुटूंबासह त्यांचे घर लॉक करुन दिवाळीसनानिमीत्त बेकरीच्या दुकानामध्ये लक्ष्मी पुजनासाठी गेले होते. लक्ष्मीपुजनाची दुकानातील पुजा आटोपल्यानंतर रात्री ०८.३० वाजता घरी गेले असता त्यांना लाकडी कपाटात ठेवलेल्या ५,५०,०००/– नगदी रुपयाची घरी चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी घटनेबाबत पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे रिपोर्ट दिला. पोलीसांनी तपासादरम्यान आरोपींच्या ताब्यातून रुपये ४८,०००/– रोख रक्कम जप्त केलेली आहे. सदर जप्त रोख रक्कम ही अर्जदाराच्या मालकीची आहे. करीता ती सुपूर्दनाम्यावर मिळण्याची विनंती केली आहे. करिता हा अर्ज.

३. सरकारी विधीज्ञांनी या अर्जास त्यांचे म्हणणे दिले. ते सांगतात पोलीस स्टेशन वर्धा शहर यांनी कलम ३८०, ४५७ भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे व त्यामधील जप्त रक्कम ४८,०००/– मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. सदर रक्कम सूपूर्तनाम्यावर देतांना काही अटी घालून दयाव्या, असेही त्यांनी म्हणन्यामध्ये नमूद केले आहे.

४. अर्जदार यांनी त्यांचे कथनापृष्ठर्थ त्यांचे आधार कार्ड आणि बँकेचे स्टेटमेंट इत्यादी कागदपत्रे सादर केलेले आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, त्यांचे लाकडी कपाटात ठेवलेले ५,५०,०००/– नगदी रुपयाची घरी चोरी झाली आणि त्यापैकी अप.क्र.१५६२/२०२२ मध्ये रोख रक्कम रुपये ४८,०००/– आरोपींकडून जप्त केले. प्रकरणाचे अवलोकन केले असता जप्तीपत्रकाव्दारे सदरची रोख रक्कम रुपये ४८,०००/– आरोपींकडून जप्त केल्याचे दिसते. अर्जदार हे सदर प्रकरणातील फिर्यादी आहे. सदर मुद्देमाला संदर्भात फिर्यादी यांचे व्यतिरिक्त आरोपीने अगर इतर कुठल्याही इसमाने स्वतःचा हक्क दर्शविलेला नाही असे दिसते.

५. अर्जदार यांनी सदर रकमेबाबत तपशिल नमूद केलेला आहे, तसेच रोख रक्कम ४८,०००/– चा तपशिल जप्तीपंचनाम्यामध्ये नमूद असल्याचे दिसते. जप्त रोख

रक्कम पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास तिचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदारा व्यतिरिक्त इतर व्यक्तीने त्या रकमेबाबत हक्क किंवा अधिकार सांगीतलेला नाही. तसेच अभियोग पक्षासही सदर रक्कम अर्जदारास अटी व शर्तीवर परत देण्यास हरकत नाही. अर्जाचे व त्यासोबत दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, अर्जदार हे प्रकरणातील फिर्यादी आहे, या गोष्टींचा विचार करता, अर्जदार विनंती करतात त्याप्रमाणे रोख रक्कम अर्जदार यांना सुपूर्तनाम्यावर देणे उचित वाटते. अशा परिस्थितीत जप्त मुद्देमाल रोख रक्कम अर्जदारास खालील अटी व शर्तीवर देणे योग्य होईल, करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते :–

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज नि.क्र.२५ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार श्री.यशवंत रामचंद्र खुबचंदानी यांनी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे रोख रक्कम रुपये ४८,०००/– (अक्षरी रुपये अठेचाळीस हजार) अर्जदारास परत करण्यात यावे आणि त्याबाबत रक्कम रुपये ४८,०००/– चे क्षतीपुर्ती बंधपत्र न्यायालयाला सादर करावे.

३. तपास अंमलदारास निर्देषीत करण्यात येते की, अर्जदारास उपरोक्त रोख रक्कम पोलीस स्टेशनमधून देण्यापूर्वी त्याचा योग्य सविस्तर स्वतंत्र पंचनामा करुन फोटो काढण्यात यावे, त्याचप्रमाणे पंचनाम्यावर व फोटोवर अर्जदाराची सही घेवून प्रकरणात न चुकता न्यायालयात दाखल करावे.

४. सदर रोख रक्कम या अनुषंगाने भविष्यात कोणत्याही व्यक्तीने त्याचा हक्क दर्शविल्यास ते अर्जदारावर बंधनकारक राहील, तसेच अटींचा भंग केल्यास क्षतीपुर्ती बंधपत्राची रक्कम देण्यास अर्जदार पात्र राहिल.

५. आदेशाची प्रत तपासी अधिकारी यांना पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात यावी.

LATA HANMANT JADHAV
Digitally signed by LATA HANMANT JADHAV
Date: 2024.09.21 11:49:16 +0530

(कु.एल.एच.जाधव)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), वर्धा, जि.वर्धा.

वर्धा.
दिनांक : २०.०९.२०२४